| | |
|---|---|
| MHWS090014132022 | दाखल दिनांक : १३.१२.२०२२<br>नोंदणी दिनांक : १३.१२.२०२२<br>निकाल दिनांक : १५.०५.२०२६<br>कालावधी : ०३ व. ०५म. ०२दि. |

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, (न्यायालय क्र. २), मानोरा यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारीः श्रीमती तृष्णा गो. बन्सोड)

**नि.फौ.ख. क्र.२६९/२०२२** **निशाणी क्र.–३६**

गुन्हयाचा तपशिल

गुन्हा क्र. : ७२७/२०२१

पोलीस स्टेशन : मानोरा पोलीस स्टेशन, मानोरा.

| | |
|---|---|
| अभियोगपक्ष | महाराष्ट्र शासन तर्फे– पोलीस ठाणे अधिकारी,मानोरा<br>तालुका पोलीस स्टेशन,मानोरा . |
| अभियोगपक्षातर्फे | विशेष सहा. सरकारी अभियोक्ता– श्री. एम. जी. शर्मा |
| आरोपी पक्ष | विशाल उर्फ लक्ष्मण अजाब होलगरे |
| आरोपी पक्षातर्फे | विद्वान विधीज्ञ टी. ए. खान पटेल |

## गुन्हयाचा तपशिल

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | २९/१०/२०२१ |
| प्रथम खबरी अहवाल तारीख | २९/१०/२०२१ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | १३/१२/२०२२ |
| दोषारोप निश्चित तारीख | १७/०२/२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ०८/०४/२०२६ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | –– |
| न्यायनिर्णयाची तारीख | १५/०५/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | –– |

## आरोपीचा तपशिल

| आ. क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीन तारीख | गुन्हा कलम | निर्दोष सोडले किंवा शिक्षा दिली | शिक्षेचे स्वरुप | जेलमध्ये बंद असलेला कालावधी – कलम ४२८ फौ.प्र.सं. प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १.<br><br><br><br><br>२. | **विशाल उर्फ लक्ष्मण अजाब होलगरे**<br>वयः२७ वर्षे, धंदाः मजुरी<br>रा. धामणी ता. मानोरा, जि. वाशिम.<br><br>**शमशाद अली असगर अली (फरार)**<br>वय २२ वर्षे, व्यवसाय– मजुरी<br>रा. रामपुर, महुअवा महाराजगज कर्माहा उत्तरप्रदेश ह. मु. वसंतनगर, मानोरा, ता. मानोरा, जि. वाशिम. | –– | –– | भा.दं.वि. चे कलम ३७९ प्रमाणे | निर्दोष सोडले | –– | –– |

## न्या य नि र्ण य

(पारित केल्याचा दिनांक १५/०५/२०२६)

प्रस्तुतचा खटला आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३७९ नुसार न्यायप्रविष्ठ आहे.

**सरकार पक्षाची थोडक्यात हकीकत अशी आहे की,**

२. घटना दिनांक २८/१०/२०२१ ते २९/१०/२०२१ रोजी सायंकाळी ०७.०० ते सकाळी १०.०० वाजताच्या दरम्यान तहसिल कार्यालय, मानोरा, ता. मानोरा जि. वाशिम येथे घडली. नमुद घटनास्थळी व वेळी मा. उपविभागीय अधिकारी कारंजा यांचे गौण खनिज अवैध वाहतुक व उत्खनन शोध पथकातील नायब तहसिलदासर श्री. व्ही. जे. जाधव कारंजा यांचे पथकाने एक ट्रॅक्टर क्रमांक एम. एच. २९ सी. २७८५ व ट्रॅक्टर ट्रॉली क्रमांक

एम. एच. ३७ ए. ९९९७ व जे.सी.बी. क्रमांक एम. एच. ३७ व्ही ८७८३ हे मौजे धामणी मानोरा येथिल एम.आय.डी.सी. परीसरातील लालमाती धामणी मानोरा या जागेवर जेसीबी मशिनद्वारे उत्खनन करुन ट्रॅक्टरद्वारे उत्खनन करतांना आढळुन आल्याने सदर जेसीबी व ट्रॅक्टर वर कार्यवाही करणे करीता पंचनामा जप्तीनामा करुन सदर जेसीबी व ट्रॅक्टर तहसिल कार्यालय मानोरा येथे जमा होते. परंतु रात्रीचे वेळेस सदर वाहन हे आरोपी क्र. १ व २ यांनी तहसिल कार्यालय मानोरा येथून सदर ट्रॅक्टर व ट्रॅक्टर ट्रॉली व जे.सी.बी. एकुण किंमत ११ लाख रुपयाची वाहने विनापरवाना चोरुन नेल्याबाबत तहसिल कार्यालय मानोरा येथून आलेल्या पत्रावरुन सदरचा गुन्हा दाखल करुन घेतला.

३. पोलीसांनी आरोपीविरुध्द गुन्हा क्र.७२७/२०२१ प्रमाणे भारतीय दंड संहिताचे कलम ३७९ अन्वये गुन्हा नोंदविला. तपासिक अंमलदार यांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला, साक्षीदारांचे बयाण नोंदविले व तपासाअंती आरोपींविरुध्द दोषारोप पत्र दाखल केले.

४. आरोपीविरुध्द भा.दं.वि. चे कलम ३७९ अन्वये नि.क्र.२५ वर दोषारोप निश्चित केले. आरोपीला दोषारोप वाचुन व समजावून सांगितला असता त्यांनी तो अमान्य केला व प्रकरण सुरु ठेवण्याची तयारी दर्शविली. आरोपीची जबानी निशाणी क्र.२६ वर आहे. सरकारपक्षाने आरोपीविरुध्दचे दोषारोप सिध्द करण्यासाठी केवळ एक साक्षीदार, साक्षीदार क्र.१ श्रीराम भगवान परांडे (घटनास्थळ पंच) यांना नि.क्र.३१ वर तपासले आहे. प्रकरणात अभियोगपक्षास पुरेपुर संधी देवूनही त्यांचे मार्फत फिर्यादी, इतर महत्वपुर्ण साक्षीदार व तपासी अधिकारी यांना पुराव्याकामी हजर करण्यात आले नाही. आरोपीविरुध्द फौजदारी प्रक्रिया संहिताचे, कलम ३१३(१)(ब) नुसार बयाण नोंदविण्यात आले नाही.

५. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

६. सरकार पक्षाचे हकीकत व आरोपींचा बचाव यावरुन निराकरणासाठी खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होतात. सदर मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष, कारणमीमांसासह खालीलप्रमाणे आहेः–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष हे सिध्द करते काय की दिनांक २८/१०/२०२१ ते २९/१०/२०२१ रोजी सायंकाळी ०७.०० ते रात्री १०.०० वाजताच्या दरम्यान आरोपींनी संगनमत करुन तहसिल कार्यालय, मानोरा, ता.मानोरा, जि. वाशिम येथून ट्रॅक्टर क्रमांक एम. एच २९ सी. २७८५ ट्रॉली क्रमांक एम. ३७ ए. ९९९७ व जे.सी.बी. मशिन क्रमांक एम. ३७ व्ही ८७८३ चोरी केली व तसे करुन भा.दं.वि.चे कलम ३७९ अन्वये गुन्हा केला ? | **...नाही** |
| २. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## का र ण मि मां सा

**मुद्दा क्रमांक १ बाबतः–**

७. साक्षीदार क्र.१ अशोक हे या प्रकरणातील घटनास्थळ पंच साक्षीदार असून सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. सदरील साक्षीदाराने पोलिसांनी त्यांच्या समक्ष घटनास्थळ जप्ती पंचनामा तयार करण्याची बाब स्पष्टपणे नाकारली आहे. तसेच त्यांनी घटनेबाबत काहीही कथन केलेले नाही. म्हणून त्यांच्या पुराव्यावर विश्वास ठेवता येत नाही.

८. प्रकरणात फिर्यादी, इतर महत्वपुर्ण साक्षीदार व तपासी अधिकारी यांना वारंवार समंस काढूनही अभियोगपक्ष त्यांना पुराव्याकामी हजर ठेवण्यास असमर्थ ठरले. वर चर्चा केल्याप्रमाणे फिर्यादी व इतर साक्षीदारांच्या पुरक पुराव्या अभावी आरोपीविरुद्ध गुन्ह्याचे घटक सिद्ध होत नाही. गुन्ह्याचे घटन सिद्ध करण्याइतरपत कोणताही पुरक पुरावा अभिलेखावर आला नाही. अभिलेखावरील पुरावा आरोपीवरील आरोपी सिद्ध करण्यास पुरेसा नाही. करीता मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष 'नकारार्थी' देण्यात येत आहे.

**<u>मुद्दा क्रमांक २ बाबतः–</u>**

९. अभिलेखाचे अवलोकन केले असता असता असे दिसून येते की, कथित घटनेच्या दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने कथित वाहनांची चोरी केल्याची बाब निःसंदेहपणे सिध्द झालेली नाही. अभियोगपक्षाने भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३७९ मधील घटकांची पुर्तता केलेली नाही. त्यामुळे आरोपीला दोषी ठरविता येत नाही, म्हणुन आरोपी निर्दोष मुक्त होणेस पात्र आहे. करीता वरील सर्व बाबींचा विचार करुन मुद्दा क्र.२ बाबत खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. आरोपी **विशाल उर्फ लक्ष्मण अजाब होलगरे** यांना फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २४८(१) नुसार भारतीय दंड संहिताचे कलम २९४, ४२७, ५०४, ५०६ अंतर्गत शिक्षेस पात्र अपराध केल्याचे आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. आ.क्र.२ यास प्रकरणातुन दोषमुक्त करण्यात येते.

४. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७(अ) च्या पुर्ततेकरीता जमानत दाखल करावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by TRUSHNA GOVINDRAO BANSOD
Date: 2026.05.15 18:46:39 +0530

**(तृष्णा गो. बन्सोड)**
दि. १५/०५/२०२६ न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.२), मानोरा.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | Smt. R. K. Chavhan (L.G.) |
| Court | - | (Smt. T. G. Bansod)<br>Jt. CJJD & JMFC, Manora. |
| Date of Judgment/Order | - | 15/05/2026 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 15/05/2026 |
| Judgment/Order uploaded on | - | 15/05/2026 |